जनवाचन आंदोलन
बालपुस्तकमाला

आवडणार नाही का तुम्हाला
पुस्तकांचं बोलणं ऐकायला?

पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय

पुस्तकांमध्ये चिमण्या चिवचिवतात
पुस्तकांमध्ये हिरवी शेतं डुलतात
पुस्तकांत झऱ्यांचं पाणी गुणगुणतं
अन् पऱ्यांच्या कथा कुजबुजतात
पुस्तकांत अग्निबाणाचं रहस्य असतं
पुस्तकांत विज्ञान बोलत असतं
पुस्तकांचं जग केवढंतरी मोठं आहे
पुस्तकांमध्ये ज्ञानाची लयलूट आहे

आवडणार नाही का तुम्हाला
त्या जगात भटकायला?
पुस्तकांना तुम्हाला काही सांगायचंय
त्यांना तुमच्या जवळ रहायचंय

-सफदर हाश्मी

मूल्य रु. ६.००

भारत ज्ञान विज्ञान समुदाय

# छकडा टांगा मोटार

लेखक डॉ. एस.पी. खत्री
मराठी अनुवाद पृथ्विराज तौर



भारत ज्ञान विज्ञान समुदाय

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समितीतर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित.

या प्रकाशनांचा उद्देश लोकांमध्ये आणि मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणं हा आहे.


पुस्तकाचे नाव : छकडा, टांगा, मोटार

लेखक : डॉ.एस.पी.खत्री

मराठी अनुवाद : पृथ्वीराज तौर

संपादन : विनया देशपांडे

चित्रकार : मनोज पंडित

निर्मिती सहाय्य :दिनानाथ मनोहर

जवाआं ४८/ बाल - २

प्रकाशन : जून २००१

मूल्य : ६ रुपये



© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)



प्रकाशक : दत्ता देसाई

राज्य सचिव, भारत ज्ञान विज्ञान समुदाय (महाराष्ट्र)

अक्षय,२१६,केळकर रस्ता,नारायण पेठ,

पुणे-४११०३०. फोन : ०२०-४४५६६९४

मुद्रणस्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे-४११००४.

अक्षर जुळणी : गणेश कांबळे


# छकडा ! टांगा !
# मोटार !



# छकडा !
# टांगा !
# मोटार !






चला ऐकूया छानशी
गोष्ट एक जुनी
पण नाही त्यात राजा
नि नाही तेथे राणी



डोंगर दऱ्यात निबिड अरण्यात
पूर्वज आपले रहात
करीत असत शिकार मनमानी
जात कुठेही भटकत रानी






शिळेवर शिळा रचून ते
छोटी गुहा बनवत.
भल्या थोरल्या दगडाचे
अन् दार छानसे बसवत.



वाघ सिंहही फिरत असत,
भिती त्यांची फार.
बाया-माणसं जात झोपी
संध्याकाळीच लावून दार.





फिरत असत शिकारीसाठी
टेहळणी रोज करत.
मासे, हरीण आणि जनावरे,
खावून ते जगत.



राहण्यासाठी घरदार नव्हते,
नव्हते कपडे-लत्ते,
गोलाकार राहत असत
जणू मधमाशीचे पोळे.





जाण आमच्या पूर्वजांकडे
जेव्हा हळू-हळू आली,
एकमेकासंगे विचाराला
सुरूवात तेव्हा झाली.



दूरवरून दगड आणत
आणत खाद्यही दूरदूरून
लांबवरची भटकंती,
वाटेल तशी करून.






कसं जावं? काय आणावं?
त्रास होतसे फार
इतक्यामध्ये कुणा एकाच्या,
मनी आला नवा विचार.




गोलाकार दोन दगडांना
घेऊनी एकजण आला.
त्यावर दोन बांबू रोवताच
खटारा तयार झाला.






खडखड-थडथड, थडथड-खडखड
चालू लागला खटारा.
त्याला पहाया त्या दिवशी,
मोठा जमाव झाला गोळा.




एके दिवशी लोक काही
शिकारीला निघाले.
हरीण, रेडे, घोडे, उंट,
मिळवायचे त्यांनी ठरवले.





हाती लागला एक रेडा,
घालून त्याला घेरा.
रेडा जखमी थोडा थोडा,
चाले लंगडत जरा जरा.




गोल दगडांच्या मधोमध,
रेडा त्यांनी बसवला.
पळून जाऊ नये म्हणून,
बंदोबस्त थोडा केला.





सुस्तावून बसला रात्रभर,
नि पहाट जेव्हा झाली.
सोबत खटारा घेऊन रेड्याने,
फेरी एक मारली.



हे पाहता लोकांना साऱ्या,
नवल वाटले फार.
रेड्याच्या त्या खटाऱ्यावर,
कुणी एक झाला स्वार.






या घटनेला घडून आता,
वर्षे हजारो झाली.
खटाऱ्याची गाडी मात्र,
न रेड्यापाठीची सुटली.



लाकडाचं चाकं आता,
वजनालाही हलके.
नि बैल, रेड्याची गाडीही,
खाली-वरती होते.





आता रथाची पाळी आली,
ज्यावर राजे चढत.
लगाम सोडताच घोडे रथाचे,
वायुवेगाने दौडत.




उंट कुठे हा पहा ओढतो,
उंचच उंच गाडी.
हीला म्हणतात उंटगाडी,
जाते तुडवित झाडी.





बर्फाळ प्रदेशी पहा गाड्यांना,
बारशिंगे ओढतात.
मोठे मोठे झबरे कुत्रे,
या कामीही येतात.



छोटी गाडी शहामृगही,
कुठे ओढत असतो.
हत्ती मोठा भार वाहताना,
असाच अवचित दिसतो.





शहरांमध्ये दिसून येतात,
टांगे, मोटार, छकडे.
प्रवाशांना पोहचवतात,
घेऊन दाम रोकडे.




पहा लागली रबरी चाके !
सायकल माझी धावते.
फरफर फरफर पळत जाते,
उशीर कुठे न करते.






या चाकांच्या जादूनेच तर,
आगगाडी धावत असते.
धडधड करत रूळांवरून,
मामाच्या गावाला जाते.




नसती जर चाके मोटारीला
काय अवस्था तिची ?
रखडत-रखडत खुरडत जाती,
वेळ खूप ही खाती.





पोलादाच्या चाकांवरती,
'रोलर' धडधड करतो.
ओबड धोबड रस्त्यांना,
सपाट करीत जातो.




गावा मधले काम उपसते,
बिच्चारी ही धमणी.
छोटे मोठे बैल ओढती,
सामानाच्या गोणी.





जर त्या दिवशी तो रेडा,
नसता आला हाती.
आणि दगडी चाकांना त्याने,
दिलीच नसती गती...



तर का सांगा दिसले असते
टांगे, मोटार, छकडे
प्रवाशांना पोहचवणारे
घेऊन दाम रोकडे!